महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास प्राप्त तक्रारीसंदर्भात.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाची स्थापना अल्पसंख्याकांचे हिताचे संरक्षण करण्याकरिता तसेच अल्पसंख्याकांवर होत असलेल्या अन्यायाचे निवारण करण्याकरिता करण्यात आलेली आहे.

अल्पसंख्याक व्यक्तीवर पोलिस यंत्रणेकडून, प्रशासकीय यंत्रणेकडून होत असलेल्या अन्यायाबाबत तसेच इतर व्यक्तींकडून होत असलेल्या अन्यायाबाबत तक्रारी प्राप्त होत असतात. ज्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी आहेत त्या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल प्राप्त करुन घेतला जातो आणि आवश्यकतेनुसार आयोगाकडून कार्यवाही करण्यात येते. तसेच शासनास त्या संदर्भात शिफारस करण्यात येते.

सन २०१२ मध्ये राज्य अल्पसंख्याक आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्रदान करण्यात आले आहे. तद्नंतर ज्या प्रकरणामध्ये पोलिस विभागाकडून किंवा प्रशासकीय यंत्रणेकडून अन्याय झाला आहे अशा स्वरुपाच्या तक्रारीसंदर्भात आयोगाकडून सुनावणी आयोजित करण्यात येतात. सदर सुनावणी दरम्यान तक्रारदार आणि संबंधित यंत्रणा या बोलावून त्यांचे म्हणणे ऐकूण घेण्यात येते तद्नंतर त्या प्रकरणासंबंधात आयोगाकडून योग्य ते आदेश निर्गमित करण्यात येतात.

शिफारस